सत्र खटला क्र. ५०/२०२१
सरकार वि. दामोदर
नि.क्र. ५०

<u>**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक २ यांची जबानी.**</u>

मी शपथेवर निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नांव | — | **सिताबाई सुभाषराव पोले,** |
| वय | — | ३५ वर्ष |
| कामधदां | — | शिपाई, वसमत ग्रामीण पो.स्टे., जि. हिंगोली |
| राहणार | — | वसमत, जि.हिंगोली. |

---

<u>**सरकार पक्षातर्फे सरतपास श्री. ए. ओ. गोदे, सहाय्यक सरकारी वकील यांचे मार्फत—**</u>

**१.** दिनांक ०७.०५.२०१९ रोजी मी पोलीस स्टेशन, पातुर येथे पोलीस कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत होते. त्या दिवशी सकाळी ९.०० ते रात्री ९.०० पावेतो सीसीटीएनएस म्हणून मी कर्तव्यावर हजर होते. त्यावेळी ८.१५ वाजता रामदास राउत हे पोलीस स्टेशनला तक्रार दयायला आले होते की, दामोदर राउत, त्यांची पत्नी व मुले त्यांच्या घरी जावून कपाटामधील सामान काढून घेवून जात आहे व त्यांच्या पत्नीला मारहाण करीत आहेत. त्याची शाहनिशा करण्यासाठी गुल्हाने साहेब, नावकार साहेब, पीएसआय महल्ले, शिंदे व मी स्वत: असे पीतांबर वाडी येथे रामदास राउत यांचे घरी सरकारी वाहनाने गेलो. तेथे त्यांचे लोखंडी कपाट जागीच आहे कि नाही, त्यातील सामान कपाटातच आहे की, नाही हे पाहत असतांना व गुल्हाने सर रामदास राउत व त्यांच्या पत्नीला विचारपूस करीत असतांना एकदम ओरडण्याचा आवाज आला. दामोदर राउत, त्यांची पत्नी, मुलगा धीरज राउत, यशस्वी राउत, दिपाली राउत व तीन चार मुले तिथे आले आणि त्यांच्या सरकारी कामात अडथळा करुन शासकीय काम करु दिले नाही. गुल्हाने साहेब त्यांना समजावून सांगत असतांना दामोदर राउत यांच्या पत्नी व मुलींनी मारहाण करुन लोटलाट केली असता मी खाली पडले. मी गरोदर असल्यामुळे मला पकडण्यासाठी महल्ले सर व शिंदे सर आले असता प्रगती आणि इशा राउत यांनी महल्ले सरांना बोखरले व लोटलाट केली. प्रगतीने महल्ले सरांचे शर्ट फाडले व गुल्हाने व नांवकार हे दामोदर यांना अटकाव करत होते. हे सर्व प्रकरण दामोदर राउत यांच्यामुळे होत असल्यामुळे गुल्हाने सर यांनी दामोदर राउत यांना पकडून सरकारी वाहनात बसवीत असतांना धीरज राउत

व वैशाली राउत यांनी ''तुम्ही आमच्या घरी कशाला आले तुम्ही भडवे आहेत'' अशी शिवीगाळ करुन तुम्हाला खोटया गुन्हयात अडकवितो. माझी मुलगी वकील आहे अशी धमकी दिली. त्यानंतर आम्ही दामोदर राउत यांना पोलीस स्टेशनला आणले. नंतर महल्ले सरांनी फिर्याद दिली. मारहाण झाल्यामुळे माझे मेडीकल दुस—या दिवशी झाले. पोलीसांनी माझे बयाण नोंदविले होते. मी आरोपीस ओळखते. आज फक्त आरोपी दामोदर राउत न्यायालयात हजर आहे.

सरतपास समाप्त.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री ठोकळ यांच्या मार्फत सुरु —</u>**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, मी प्रथम साक्षीदाराच्या पिंज—यात आल्यानंतर मला या प्रकरणाबाबत कल्पना नाही असे सांगितले होते. मला सरकारी वकीलांनी माझा जबाब वाचून दाखविला नाही व मी वाचला नाही. सरकारी वकीलांनी मला प्रश्न विचारले. हे म्हणणे खरे आहे की, मला विस्मृतीचा कोणताही आजार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या डयुटया आदल्या दिवशीच लागतात. आमची डयुटी सकाळी ९.०० ते रात्री ९.०० असते. आमच्या डयुटया पोलीस स्टेशनमध्ये लागलेल्या होत्या. साक्षीदार स्वत:हून सांगतात की, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यानंतर जेवढे पोलीस पोलीस स्टेशनला हजर असतात तेवढया पोलीसांना घेवून जातात. हे म्हणणे खरे आहे की, रामदास आणि दामोदर यांचा वाद घरगुती होता. हे म्हणणे खरे आहे की, ज्या वेळेस आम्ही घटनास्थळी गेलो त्यावेळी रामदास, रामदासची पत्नी प्रतिभा आणि पोलीस यांच्या व्यतिरिक्त कोणीही नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही घटनास्थळी पोहोचलो त्यावेळेस तेथे दंगल किंवा हाणामारी काहीही चालू नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही घटनास्थळी गेलो तेव्हा तेथे कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण झालेला नव्हता. रामदासने तक्रार माइयाकडे दिलेली नव्हती. ती तक्रार डे ऑफीसरकडे दिली होती. ती दखलपात्र गुन्हयाची तक्रार होती. आम्ही जेव्हा घटनास्थळी गेलो तेव्हा आरोपीविरुध्द कोणताही गुन्हा पोलीस स्टेशनमध्ये दाखल नव्हता.

**प्रश्न** — तुमच्या पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल होण्याच्या आधी घटनास्थळावर जाण्याची पध्दत आहे काय?

**उत्तर** — रामदास राउत यांनी असे सांगितले की, दामोदर राउत त्यांच्या पत्नीला

मारत आहेत त्यामुळे गुन्हा दाखल करायच्या आधी घटनास्थळी चला आणि तिला वाचवा.

**३.** आम्ही घटनास्थळावर जातांना आमच्या सोबत ॲम्बूलन्स नेली नव्हती. आम्ही घटनस्थळावर गेल्यावर रामदास राउतच्या पत्नीला ताबडतोब दवाखान्यात नेले नाही. आम्ही घटनास्थळावर गेल्यावर रामदासच्या पत्नीला मुका मार लागला होता व त्या रडत होत्या. आमच्या पोलीस स्टेशनमध्ये कोणाला मुका मार लागला तर दवाखान्यात न नेण्याची पध्दत नाही. घटनास्थळी गेल्यावर मी स्वत: आरोपीने रामदासच्या घरातून कोणते सामान नेले याची यादी तयार केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही सर्व पोलीस घटनास्थळावर सोबत गेलो आणि सोबतच आलो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही घटनास्थळावर सर्व जण सोबतच होतो. आमच्यापैकी कोणत्याही पोलीसांनी आम्ही गेलो त्या ठिकाणी रामदासचे घर होते याची कागदपत्रे गोळा केले नाही. आम्ही घटनास्थळी गेलो तेव्हा रामदास व त्याच्या पत्नीला दवाखानयात नेले होते. त्यांना दवाखान्यात कोणी नेले होते याची मला माहिती नाही. त्यांना दवाखान्यात कोणी नेले होते हे मला अंदाजे सांगता येत नाही.

**४.** आम्ही आरोपीला पोलीस स्टेशनला आणले होते परंतु अटक करुन आणले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस गुल्हाने यांनी आरोपी दामोदर यांना मारहाण केली व पोलीस स्टेशनला आणले.

**प्रश्न** – आरोपी दामोदर यांच्यावर गुल्हाने साहेबांनी कोणत्या प्रकारे बळाचा वापर केला.

**उत्तर** – समजावून सांगितले आणि गाडीत बसविले.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सर्वांनी आरोपी दामोदर यांना काठीने मारुन त्यांचा हात मोडला. मला हे आठवत नाही की जागृती राउत ही आमची मोबाईलवन शुटींग घेत होती. मला हे माहिती नाही की तो मोबाईल महल्ले साहेबांनी तिच्याकडून घेतला. गुल्हाने साहेबांसोबत जाण्यासाठी आम्हाला लेखी आदेश नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, रामदासला घर ताब्यात देण्यासाठी आम्ही बेकायदेशीर कार्यवाही केली. मला हे माहिती नाही की, दामोदरला आम्ही बेकायदेशीर उचलून

आणल्याबाबत त्यांनी तक्रार केली किंवा काय.

**६.** माझे बयाण घ्यायच्या आधी मला इतर साक्षीदारांचे बयाण वाचायला दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, गुल्हाने साहेब यांना मदत करण्यासाठी मी खोटे बयाा दिले आणि आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

दि. ०७.०४.२०२६ सही/—

(एम.एस.भदाणे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अकोला